महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वार्षिक अहवाल
२००९-२०१०

वीज निर्मिती - पिढयान्पिढयांसाठी

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वार्षिक अहवाल

२००९-२०१०

वार्षिक अहवाल २००९-२०१०

अनुक्रमणिका

तपशील	पृष्ठ क्रमांक
संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)	१
सूचना (वार्षिक सर्वसाधारण सभा)	२
संचालक मडंळाचा अहवाल	४
महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य	३२
महानियंत्रक व महालेखा परिक्षकांच्या अहवालाला उत्तर	३६
लेखा परिक्षकांचा अहवाल	४१
आर्थिक ताळेबंद	४८
नफा-तोटा विवरण	४९
ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची	५०
हिशेब तक्त्यावरील टीपा	५८
रोकड प्रवाह विवरण	८७
कंपनी कायदा १९५६ उपविभाग २१२ (३) प्रमाणे विवरण	९१
आगामी प्रकल्प	९२

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

संचालक मंडळ

(१-०४-२००९ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)

श्री. पी. अब्राहम

अध्यक्ष

(२९-०७–०५ पासून १७-०५-२०१० पर्यंत)

श्री. सुब्रत रथो

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

(१७-०५-२०१० पासून ते आजपर्यंत)

व्यवस्थापकीय संचालक	**श्री. सुब्रत रथो** (१७-०५-१० पर्यंत)
संचालक (वित्त)	**श्री. जी.जे. गिरासे** (०१-०६-०७ पासून)
संचालक (संचलन)	**श्री. एम्.आर. शेलार** (२६-११-१० पर्यंत)
संचालक (प्रकल्प)	**श्री. सी.एस्. थोटवे** (३१-०८-०९ पासून)
संचालक	**श्री. पी.व्ही. पागे** (०१-१२-०८ पासून)

सूचना

या पत्रकाद्वारे जाहिर सूचना देण्यात येत आहे की महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित या संस्थेच्या भागधारकांची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा २८ सप्टेंबर २०१० रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू.), मुंबई - ४०० ०५१ या ठिकाणी आयोजित केलेली असून त्यात खालील विषयांवर चर्चा होईल.

व्यवहारातील सर्वसाधारण विषय

१) कंपनीचे परिक्षित ताळेबंद ३१/०३/२०१० तसेच याच वर्षाअखेरीचा नफा तोटा परिपत्रक या बाबींचे सादरीकरण व त्यावर चर्चा करून ते स्वीकृत होणे आणि संचालकांचा अहवाल व लेखा परिक्षकांचा अहवाल सादर करणे.⋆

२) खालील ठराव विचारार्थ मांडला जाऊन तो योग्य वाटल्यास ह्यात काही आवश्यक बदल करून अथवा तसाच्या तसा सर्वसाधारण ठराव म्हणून पारित करणे,

ठराव करण्यात येत आहे की, आस्थापनाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ साठी कंपनी कायदा १९५६ च्या कलम २२४ (८) (अअ) चे कलम ६१९ (२) सहित वाचायचे आहेत व कंपनी कायदा १९५६ च्या इतर लागू तरतुदीनुसार आपल्या सांविधिक हिशेब तपासनीसांना देण्यात येणारी पारिश्रमिक रक्कम तसेच वरकड खर्चा प्रीत्यर्थ अतिरिक्त रक्कम ठरवण्याचे काम संचालक मंडळ करेल.

ठराव करण्यात येत आहे की आस्थापनाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० साठी कंपनी कायदा १९५६ च्या कलम २२४ (८) (अअ) चे कलम ६१९ (२) सहित वाचायचे आहेत व कंपनी कायदा १९५६ नुसार भागधारकांच्या एकमताने सांविधिनिक हिशेब तपासनीसांचा भारताचे नियंत्रक व महालेखापालाने नेमलेला मेहनताना देण्यात यावा.

₹ १८ लाख व प्रत्यक्ष वरकड खर्चा प्रीत्यर्थ देण्यात येईल.

या व्यतिरिक्त आणखी असाही ठराव पारित करण्यात येतो आहे की कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक या ठरावाद्वारे सर्व कामकाज / कार्यवाही व आवश्यक ते सर्व नियम अंमलात आणण्यासाठी सर्वाधिकार ग्रहण करतील.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

राहुल दुबे

कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: ८ सप्टेंबर २०१०

⋆ २४/२/२०११ च्या स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल स्वीकारण्यात आला.

टीपा

१) मतदानाचा हक्क असलेला सभासद हा (फक्त) मतदानासाठी आपला प्रतिपत्री (प्रॉक्सी) नेमू शकतो. असा प्रतिपत्री सभेला हजर राहून कंपनीच्या सभासदाच्या वतीने मतदान करु शकतो पण असा प्रतिपत्री कधीही कंपनीचा सभासद असू नये.

२) १९५६ च्या कंपनी कायदा अनुच्छेद ६१९(२) नुसार सरकारी मालकीची कंपनी आपले सांविधिक हिशेब तपासनीस हे भारताचे नियंत्रक व महालेखाकार मार्फतच केवळ नेमू शकेल आणि सांविधिक हिशेब तपासनीस मंडळाचा मेहनताना हे प्रत्येक कंपनीच्या सर्वसाधारण सभेत कंपनी सभासदांकडून मंजूर केले जाईल.

   कंपनी कायदा १९५६ च्या विभाग २२४ (८)(अअ) व कलम ६१९ (२) च्या अनुरोधाने सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संचालक मंडळाला आर्थिक वर्ष १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ या कालवधी करिता संविधानिक हिशेब तपासनीसांच्या मेहनतानाची व वरकड खर्चाची रक्कम ठरविण्याचे अधिकार द्यावेत. तसेच आर्थिक वर्ष २००९-१० करीता ठरविण्यात आलेल्या मेहनताना रकमेस मंजुरी द्यावी.

३) या सूचना परिपत्रकात उल्लेख झालेल्या बाबीसंबंधीची सर्व कागदपत्रे, पुस्तके, दफ्तरे तपासणीसाठी सभासदांना या सभेच्या कार्यकालापर्यंत कंपनीच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध राहतील.

संचालक महामंडळाचा अहवाल

माननीय सभासद

आपल्या कंपनीचा पाचवा वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २०१० या वर्ष अखेरीचे परिक्षित लेखा विवरण आपल्या समोर सादर करताना आनंद होत आहे.

वित्तीय परिणाम

(₹ लाखांमध्ये)

	२००९-१० (₹)	२००८-०९ (₹)
उत्पन्न		
वीज विक्रीतून आलेला महसूल (निव्वळ)	११०८३२५.०६	९३४६४९.३६
इतर उत्पन्न	१०३२८.८९	१३४११.१६
एकूण उत्पन्न	**१११८६५३.९५**	**९४८०६०.५२**
खर्च		
इंधन किंमत	८३१३०२.०८	७१५६२४.९९
निर्मिती, प्रशासन व इतर खर्च	११३२४१.३९	८७६४०.६९
कर्मचारी खर्च	५५६६८.६८	६३०१२.१०
घसारा/अमूर्तकरण	३००९४.२०	३०७५३.२९
व्याज आणि वित्तिय भार	४६९८८.१३	४४८३२.९७
करभरणा करण्यापूर्वी तसेच तरतूद व कालपूर्व समायोजनापूर्वी निव्वळ नफा	**४१३५९.४७**	**६१९६.४८**
कर	१९१०३.७५	(११३१.७८)
कर भरल्यानंतर नफा परंतु कालपूर्व समायोजनापूर्वी	**२२२५५.७२**	**७३२८.२६**
वजा - कालपूर्व तरतूद	१९१५.८८	(१०८१.२५)
कर भरणा केल्यानंतर उरलेला निव्वळ नफा	**२०३३९.८४**	**८४०९.५१**

वित्तिय कार्य

कंपनीचे या आर्थिक वर्षात एकूण उत्पन्न १८.०१% ने वाढले असून ते या वर्षी ९४८०६०.५२ लाख रुपये पासून १११८६५३.९५ लाख एवढे झाले आहे. कालपूर्व तरतुदीपूर्वी कर भरल्यानंतर झालेला नफा ₹ २२२५५.७२ लाख इतका झाला असून गतवर्षी तो ₹ ७३२८.२६ इतका होता. यावर्षी इंधनाची किंमत १६.१६% वाढली असून गेल्या वर्षी ती १९.३१% होती. निर्मिती व प्रशासन खर्च २९.२१% ने वाढला असून गेल्यावर्षी तो ३% ने वाढला होता. कर भरल्यानंतरचा निव्वळ नफा ₹ २०३३९.८४ लाख झाला असून गेल्या वर्षी तो ₹ ८४०९.५१ लाख होता म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत १४१% ने वाढला आहे.

लाभांश

भविष्य काळात कंपनीला जी प्रचंड प्रमाणात क्षमता विस्तारीत करणे गरजेचे आहे त्यासाठी विविध योजना विचाराधीन असून त्यासाठी फार मोठा निधी उभारणे अत्यंत गरजेचे आहे. आज महाराष्ट्रात आपण अनुभवित असलेला तीव्र वीज पुरवठा तुटवडा भरुन काढण्यासाठी या सर्व योजना तातडीने कार्यान्वित करायला हव्यात. याच कारणास्तव आपल्या संचालक मंडळीने आज उभारलेला जास्तीचा निधी या प्रस्तावित योजनांसाठी कंपनी व्यवहारात पुन्हा परत करायचे ठरवले आहे. त्यामुळे सभासंदासाठी या आर्थिक वर्षासाठी लाभांश म्हणून काही जाहीर केलेला नाही.

परिणामकारक चालू कृति

म.रा.वि.नि.कं.म. ची एकूण प्रतिस्थापित क्षमता १०२४६ मेगावॅट आहे आणि ३१ मार्च २०१० ला कमी केलेली क्षमता १०१२१ मेगावॅट झाली आहे. १७ ऑगस्ट २००९ रोजी महाजेनको ने घाटघर पीएसएस (१*१२५ मेगावॅट) हस्तगत केला आहे

२००९-२०१० या वर्षकाळात कोळसा वापर वीजनिर्मिती केंद्रातील सरासरी उपलब्धता गुणक हा ८८.४०% आहे तर गेल्या वर्षी तो ८६.६९% होता. संच भार गुणक ६९.७१% होता. २००९-१० काळात संच दुरुस्तीचे काम १८ संचांवर करण्यात आले तर २००८-०९ ला ते २४ संचावर केले होते. २००९-१० काळात नियोजित उत्प्रवाह आणि बळजोरी उत्प्रवाह गुणक हे ५.८२% व ५.७८% झाले तर २००८-०९ साली ते ८.४१% व ४.९०% इतके होते. गॅसवर चालणाऱ्या केंद्राची सरासरी उपलब्धता ९३.४९% होती आणि पीएलएफ ६८.४६% होता.

इतर परिणामकारक चालू कृति स्त्रोत खालीलप्रमाणे -

यावर्षीची कोळसा इंधनातून वसुली ८९.४९% इतकी असून गतवर्षी ती ८८.११% होती. कोळसा वापराचा निश्चित दर ०.८२६ कि./किलोवॅट इतका असून गतवर्षी तो ०.८२८ कि./किलोवॅट इतका होता. यावर्षी बाष्पपात्र नळ गळतीची टक्केवारी ३.०२% इतकी असून गतवर्षी ती २.३८% इतकी होती. निश्चित तेल वापराचा दर यावर्षीसाठी ३.५६ मिली/किलोवॅट इतका असून गेल्यावर्षी तो ४.१२ मिली/किलोवॅट इतका होता. सहकार्य वापर यावर्षी ९.९३% इतका असून गतवर्षी तो ९.४९% एवढा होता. यावर्षी कोळसा वापरातून एकूण सरासरी उष्णता दर ३५३७ किलो कॅलरी / किलोवॅट इतके आहे. यावर्षीचा उष्णता दर २९८९ किलोकॅलरी/किलोवॅट इतके होते. यावर्षीचा संक्रमण तोटा१.९९% इतका असून गतवर्षी तो ०.९६% इतका होता.



पुरवठा आकलनशक्ति

कंपनीकडे ७ वेगवेगळ्या ठिकाणी औष्णिक वीज उत्पादन केंद्रे आहेत. शिवाय एक केंद्र गॅस वीज चक्कीवर चालणारे आहेत आणि २४ जलविद्युत केंद्रे कार्यरत आहेत. त्या सर्वांची एकूण वीज निर्मिती क्षमता ही ३१/३/२०१० च्या आकडेवारीनुसार खालीलप्रमाणे आहे.

प्रकार	क्षमता
औष्णिक	६८०० मेगावॅट
वायु	८५२ मेगावॅट
जलविद्युत	२४६९ मेगावॅट
एकूण	१०१२१ मेगावॅट



क्षमता वाढवणारे कार्यक्रम

महाराष्ट्र राज्यातील वाढती वीज मागणी पूर्ण करण्यासाठी आपली कंपनी अनेक औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प सुरु करीत आहे.

अ) चालू प्रकल्प - ५२३० मेगावॅट (वाढीव क्षमता : ४७७० मेगावॅट).

१) परळी औ.वि.कें. संच ७ (२५० मेगावॅट)

या प्रकल्पासाठी लागणारी सयंत्रे व साधने यांची मागणी ३१/८/०६ रोजी मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. खालील महत्वपूर्ण कामांची पूर्तता करण्यात आली.

अ.नु.	महत्वपूर्ण कामगिरी	पूर्ण संपादीत झाल्याचा दिनांक
३१.०३.०९ पर्यंत		
१)	बाष्पपात्र पिंप उचलणी	१५.०४.०८
२)	विद्युत संग्रह यंत्र उभारणी आरंभ	१५.०७.०८

३)	टीजी उभारणीचा आरंभ	२५.०९.०८
४)	स्टेटर उचलणी	०१.११.०८
५)	जल चाचणी - वाहणारी	१७.१२.०८
२००९-१० या वर्षात		
६)	जल चाचणी -न वाहणारी	०४.०७.०९
७)	बाष्पपात्र ज्वलन	१२.०७.०९
८)	तेल फवारणीची सुरुवात	०६.०८.०९
९)	अल्कली बाष्पीकरण व आम्ल स्वच्छीकरण	१३.०८.०९
१०)	जनित्रे ठोसीकरण	१७.०८.०९
११)	बाष्प फुंकणे	१९.१०.०९
१२).	संच समकालीन करणे	१२.११.०९
१३)	कोळसा ज्वलन	०२.०१.१०

१०.०२.०९ रोजी संच पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्यात आला आणि प्रकल्पाचे पुढील काम चालु आहे.

२) पारस औ.वि.कें. संच ४ (२५० मेगावॅट)

या प्रकल्पासाठी लागणारी सयंत्रे व साधने यांची मागणी ३१/८/०६ (शून्य दिनांक) रोजी मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. खालील महत्वपूर्ण कामांची पूर्तता करण्यात आली.

अ.नु.	महत्वपूर्ण कामगिरी	पूर्ण संपादीत झाल्याचा दिनांक
३१.०३.०९ पर्यंत		
१)	बाष्पपात्र पिंप उचलणी	१५.०५.०८
२)	विद्युत संग्रह यंत्र उभारणी आरंभ	१८.०८.०८
३)	टीजी उभारणीचा आरंभ	२२.०९.०८
४)	स्टेटर उचलणी	२१.११.०८
५)	जल चाचणी - वाहणारी	१८.०२.०९
२००९-१० या वर्षात		
६)	जल चाचणी -न वाहणारी	०२.०७.०९
७)	पवनचक्की ज्वलन	०३.०७.०९
८)	बाष्पपात्र ज्वलन	२२.०७.०९
९)	तेल फवारणीची सुरुवात	२३.०७.०९
१०)	अल्कली बाष्पीकरण व आम्ल स्वच्छीकरण	३०.०८.०९
११).	संच समकालीन करणे	३०.११.०९
१२)	कोळसा ज्वलन	१८.०२.१०

२७.०३.१० रोजी संच पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्यात आला आणि प्रकल्पाचे पुढील काम चालु आहे.

३) खापरखेडा औ.वि.कें. संच ५ (५०० मेगावॅट)

या प्रकल्पासाठी लागणारी मूख्य सयंत्रे व साधने यांची मागणी दि. २३/०१/०७ (शून्य दिनांक) रोजी मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. उर्वरित संयंत्राची मागणी दिनांक ०३/०७/०७ रोजी मेसर्स बीजीआर एनर्जी सिस्टिम लि. यांच्याकडे सोपवण्यात आली आहे आणि खालील महत्वपूर्ण कामाची पूर्तता करण्यात आली आहे.

अ.नु.	महत्वपूर्ण कामगिरी	पूर्ण संपादीत झाल्याचा दिनांक
३१.०३.०९ पर्यंत		
१)	बाष्पपात्र पिंप उचलणी	२८.११.०८
२)	विद्युत संग्रह यंत्र उभारणी आरंभ	२८.०३.०९
२००९-१० या वर्षात		
३)	टीजी उभारणीची सुरुवात	१५.०४.०९
४)	स्टेटर उचलणी	२४.१०.०९
५)	जल चाचणी - वाहणारी	५.११.०९

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे.

४) भुसावळ औ.वि.कें. संच ४ व ५ (२×५०० मेगावॅट)

या प्रकल्पासाठी लागणारी मूख्य सयंत्रे आणि साधनांची मागणी दि. २३/०१/०७ (शुन्य दिनांक) रोजी मेसर्स भेल यांच्याकडे सोपवण्यात आली. उर्वरित संयंत्रांची मागणी दि. ५/११/०७ रोजी मेसर्स टाटा प्रकल्प मर्या. यांच्याकडे सोपवण्यात आलेली आहे. खालील महत्वपूर्ण कामांची पूर्तता करण्यात आली.

अ.नु.	महत्वपूर्ण कामगिरी (संच ४)	पूर्ण संपादीत झाल्याचा दिनांक
३१.०३.०९ पर्यंत		
१)	बाष्पपात्र उभारणीस आरंभ	२६.०३.०८
२)	बाष्पपात्र पिंप उचलणी	०९.०१.०९
३)	विद्युत संग्रह यंत्र उभारणी आरंभ	१४.०३.०९
२००९-१० या वर्षात		
४)	टीजी उभारणीची सुरुवात	३०.०४.०९
५)	जल चाचणी - वाहणारी	३१.०३.१०

अ.नु.	महत्वपूर्ण कामगिरी (संच ५)	पूर्ण संपादीत झाल्याचा दिनांक
३१.०३.०९ पर्यंत		
१)	बाष्पपात्र उभारणीस आरंभ	०३.०८.०८
२००९-१० या वर्षात		
२)	बाष्पपात्र पिंप उचलणी	२०.०४.०९

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे. संच ४ ची नियोजित चाचणी मार्च २०११ मध्ये घेण्यात येईल. त्यापाठोपाठ मे २०११ मध्ये संच ५ ची नियोजित चाचणी घेण्यात येईल.

सरकारी ठराव क्रं. व्ही. नी. के. २००५/प्र.क्र. २०४४/ऊर्जा - ४ दि. १२/०५/०६ नुसार महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पांना मंजुरी दिली आहे.

५. चंद्रपूर औ.वि.कें. संच ८ व ९ (२ × ५०० मेगावॅट)

या प्रकल्पासाठी लागणारी मुख्य साधनसामुग्रींची मागणी २५/०७/०८ रोजी (शून्य दिनांक ०९/०२/२००९) मेसर्स भेल यांना देण्यात आली.

२००९-१० या वर्षातील महत्त्वपूर्ण बाब म्हणजे बाष्पपात्र पुरवठा दि. १.०४.१० रोजी करण्यात आला. प्रकल्पाच्या उर्वरित सामानाची मागणी मेसर्स बीजीआर एनर्जी सिस्टिम्स लि. चेन्नई यांच्याकडे दि. १२.०६.०९ रोजी देण्यात आली.

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे. संच ८ ची नियोजित चाचणी जुलै २०१२, त्यापाठोपाठ संच ९ ची नियोजित चाचणी ऑक्टोबर २०१२ मध्ये घेण्याचे ठरले आहे.

सरकारी ठराव क्रं. प्रकल्प - २००७/ प्र. क्रं. ११०६ / ऊर्जा - ४ दिनांक ५/०३/०८ नुसार महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे.

६. परळी औ.वि.कें. संच ८ (१×२५० मेगावॅट चालू २×२० मेगावॅट कमी झालेली क्षमता संचाच्या बदल्यात - एकूण क्षमतावाढ २१० मेगावॅट)

या प्रकल्पासाठी लागणाऱ्या मुख्य सयंत्र व साधनाची मागणी दिनांक २०/०१/०९ रोजी मेसर्स भेल यांच्याकडे देण्यात आली

नैसर्गिक थंड कळस नमुना वगळता २००९-१० या वर्षात उर्वरित प्रकल्पाचे सामान मेसर्स सुनिल हाय-टेक इंजिनिअर्स लि. नागपूर यांना दि. ०१.०१.२०१० रोजी सोपवण्यात आली आहे. नैसर्गिक थंड कळस नमुन्याची मागणी मेसर्स गॅमन इंडिया लि. मुंबई यांच्याकडे दि. ०५.०१.२०१० ला सोपविण्यात आली.

प्रकल्पाचे पुढील काम सुरु आहे. नियोजित चाचणी जानेवारी २०१२ मध्ये होईल.

पत्र क्र. प्रकल्प २००८/प्र.क्र. १४९१/अर्जा ४ दिनांक २९-०१-०९ नुसार महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प मंजूर केला आहे.

७. **कोराडी औ.वि.कें. संच ८,९,१० (३×६६० मेगावॅट - संच ८ चालू ४×१०५ मेगावॅट कमी झालेल्या क्षमता संचाच्या बदल्यात - एकूण क्षमतावाढ १५६० मेगावॅट)**

२००९-१० या वर्षात बाष्पपात्र आणि पवन चक्की जनित्र गठ्ठयाची मागणी मेसर्स एल ॲन्ड टी यांच्याकडे दि. २३.०९.०९ रोजी देण्यात आली.

१७.०३.२०१० रोजी उर्वरित प्रकल्प आणि त्या अनुषंगाने लागणाऱ्या बांधकामाची निविदा जाहीर करण्यात आली. निविदांची विक्री दि. २९.०३.१० ते १७.०४.२०१० दरम्यान करण्यात आली.

प्रकल्पाचे काम पुढे चालू आहे. संच ८ ची चाचणी २३.१२.२०१३, संच ९ ची चाचणी २३.०६.१४ व संच १० ची चाचणी २३.१२.२०१४ रोजी नियोजित केली आहे.

महाराष्ट्र शासनाने ठराव क्रं. प्रकल्प २००८/प्र.क्र./११८९/उर्जा ४ दिनांक १४/१०/०८ द्वारे प्रकल्पाला मंजूरी दिली आहे

अपारंपारिक उर्जा स्त्रोत प्रकल्प (क्षमता वाढ : १ मेगावॅट)

चंद्रपूरच्या महा औष्णिक ऊर्जा स्थानकात १ मेगावॅटचा सौर ऊर्जा वीज प्रकल्प उभारण्याचे काम मेसर्स मोझरबिअर इंडिया लि., नवी दिल्ली या कंपनीला दि. ११.०६.०९ रोजी देण्यात आले. हा प्रकल्प दि. ०९.०४.२०१० रोजी कार्यान्वित झाला आणि आता पूर्णपणे कार्य करतो.

ब) भविष्य कालीन प्रकल्प प्रस्ताव - ७१६० मेगावॅट (एकूण क्षमता वाढ ७०५० मेगावॅट)

१) **भुसावळ औ.वि.कें. संच ६ (१×६६० मेगावॅट - चालू ५५ मेगावॅटच्या बदल्यात पारस व भुसावळ - एकूण क्षमता वाढ ५५० मेगावॅट)**

जमीन धारणेची प्रक्रिया सुरू आहे. आताच्या आखणीनुसार प्रकल्पाच्या मुख्य सयंत्राची मागणी मार्च २०११ पर्यंत निश्चित करण्यात येईल. या नियोजनानुसार प्रकल्पाची चाचणी जून २०१५ पर्यंत होईल.

२) **दोंडाईचा औ.वि.कें. संच १ आणि २ (२×६६० मेगावॅट)**

जमीन धारणेची प्राथमिक प्रक्रिया सुरु आहे. योजनेनुसार सयंत्राची मागणी मे २०११ पर्यंत अपेक्षित आहे. यानुसार संच १ ची चाचणी प्रक्रिया जानेवारी २०१५ व संच २ ची चाचणी फेब्रुवारी २०१६ ला अपेक्षित आहे.

३) **दोंडाईचा औ.वि.कें. संच ३,४ आणि ५ (३×६६० मेगावॅट)**

महानिर्मितीने दोंडाईचा औ. वि.कें चा आणखी विस्तार करण्याचे ठरविले आहे. ६६० मेगावॅट क्षमतेचे तीन नवीन संच ३, ४ आणि ५ असे निर्माण करावयाचे आहेत. योजनेनुसार सयंत्रांची मागणी नोव्हें २०११ पर्यत पूर्ण होईल. यानुसार संच ३ ची नियोजित चाचणी फेब्रुवारी २०१६, संच ४ ची चाचणी ऑगस्ट २०१६ आणि संच ५ ची चाचणी फेब्रुवारी २०१७ ला अपेक्षित आहे.

४) उरण वायु औ.वि.कें. संच ९ व १० (१२२० मेगावॅट)

१२२० मेगावॅटचा उच्च दर्जाचा वायुवर आधारित सीसीपीपी प्रकल्पाकरिता घाऊक कंत्राट देण्यासाठी दि. १९.०३.२०१० रोजी निविदा सूचना जाहिर करण्यात आली. निविदांची विक्री २९.०३.२०१० ते १७.०४.२०१० दरम्यान करण्यात आली. योग्य खरेदी मुल्यात वायुची उपलब्धता पडताळून कंत्राट अंदाजे जून २०१० पर्यत देण्याचा अनुमान आहे. यानुसार संच ९ ची (८१४ मेगावॅट) चाचणी सप्टेंबर २०१२, त्यानंतर संच १० ची (४०६ मेगावॅट) चाचणी डिसेंबर २०१२ ला अपेक्षित आहे. वायुच्या उपलब्धतेचा कसून शोध घेण्याचे काम सुरु आहे..

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रं. व्ही. नी.प्र. २००५/प्र.क्र.१९६७/ऊर्जा ७ दिनांक १.६.२००५ च्या आदेशानुसार १०४० मेगावॅट क्षमतेच्या स्थापिताचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. १२२० मेगावॅट क्षमतेच्या मंजुरीसाठी बोलणी सुरु आहेत.

५) धोपावे प्रकल्प संच - १ ते ३ (३×६६० मेगावॅट)

सचिव (ऊर्जा) यांच्या दि. २.०१.२०१० च्या पत्रानुसार त्यांनी महानिर्मितीला धोपावे प्रकल्प महानिमिर्मिती अंतर्गत घेण्यासाठी योग्य ती पावले उचलण्यास सांगितले आहे. यासंदर्भात महानिर्मितीने धोपावे येथे ३×६६० मेगावॅट प्रकल्प स्थापनेचा प्रस्ताव ठेवला आहे. जमीन खरेदी करण्याची प्राथमिक प्रक्रिया सुरू आहे. सध्याच्या नियोजनानुसार मुख्य संयंत्राची मागणी मे २०११ पर्यंत देणे अपेक्षित आहे. याप्रमाणे संच १ ची चाचणी ऑगस्ट २०१५, त्यानंतर संच २ ची चाचणी फेब्रुवारी २०१६ आणि संच ३ ची चाचणी ऑगस्ट २०१६ ला अपेक्षित आहे.

दुय्यम व संयुक्त उपक्रम

महागुज कॉलीअरीज लि.: ही संस्था आपली कंपनी आणि गुजरात राज्य वीज कंपनी मर्यादित यांच्यातील मच्छकाटा येथील कोळसा खाणीतील कोळसा काढण्याची संयुक्त प्रक्रिया आहे. हा प्रकल्प राबविण्यासाठी कंपनीने खाण विकास अधिकारी व चालक नियुक्त केले आहेत. काही आवश्यक प्राथमिक कामे, जसे जागा मिळविणे, विविध सरकारी परवाने मिळविणे चालू झाले आहे. दि. ६ मे २०१० रोजी एमडीओ म्हणजेचे मेसर्स अडानी इंटरप्रायझेस लि. आणि महागुज कॉलिओरीज लि. यांच्यामध्ये कोळसा पुरवठा करारावर सह्या झाल्या.

चालू वर्षात महागुज कॉलिअरिज लि. आणि संयुक्त उपक्रम भागीदार म्हणजेच महाजेनको आणि गुजरात राज्य वीज कंपनी मर्यादित यांच्यात इंधन पुरवठा करार होण्याची शक्यता आहे.

कोळसा मंत्रालयाने (भारत सरकार) या प्रकल्पातील नापसंत केलेला कोळसा प्रशिक्षित बाहेरील संस्थान (एमडीओ सह) विद्युत निर्मितीसाठी खड्डयाच्या मुखाशी वापरण्यास परवानगी दिली आहे. अशा प्रकारे निर्मिती झालेली वीज मेसर्स महाजेनको आणि जीएसइसीएल द्वारे वापरण्यात येईल म्हणून न वापरलेला कोळसा वापरुन वीज निर्मिती करण्याचे विद्युतगृह खड्डयाच्या मुखाशी बांधायचे ठरविले आहे. या प्रकल्पांचा कच्चा आराखडा तयार करण्यात आला आहे. मच्छकाटा येथील कोळसा खाणीची क्षमता लक्षात घेता कोळसा मंत्रालयाने खाणीची क्षमता ३० एमटीपीए वरुन ५० एमटीपीए एवढी वाढवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे महागुज कॉलरिजच्या व्यवस्थापनाने खाणीची क्षमता ३० एमटीपीए वरून ५० एमटीपीए वाढवण्याचे मान्य केले आहे.

धुळे औष्णिक वीज कं. लि.: या संस्था विविध औष्णिक प्रकल्प म्हणून भारत सरकारच्या वीज मंत्रालयाच्या (केस २) मार्गदर्शक तत्वानुसार उभारलेल्या आहेत. या वर्षात या कंपनीत काहीही कामकाजाची नोंद नाही.

यूसीएम कोळसा कं. लि.: युसीएम कोळसा कं. लि. ही संस्था आपली कं. आणि उत्तर प्रदेश राज्य विद्युत उत्पादन निगम लि. आणि छत्तीसगड खाण विकास महामंडळ (सीएमडीसी) यांच्यातील संयुक्त उपक्रम आहे. ही चेंदीपाडा आणि चेंदीपाडा 2 येथील कोळसा संयुक्तपणे वापरते. यातील म.रा.वि.नि.कं.म. चा हिस्सा (२×६६० मेगावॅट) दोंडाईचा येथील अत्यंत अत्याधुनिक वीज प्रकल्पासाठी वापरण्यात येईल.

अपांरपारिक उर्जा स्त्रोत उभारण्यासाठी कंपनीने घेतलेला पुढाकार (सौर उर्जा निर्मिती)

अपांरपारिक ऊर्जा स्त्रोत (क्षमता वाढ: ४ मेगावॅट)

मंडळाच्या १५.०१.२०१० रोजी झालेल्या सभेत (मं. अ - २०१०/६१२ दि. २९.०१.२०१०) चंद्रपुर औष्णिक ऊर्जा प्रकल्प येथील १ मेगावॅट सौरऊर्जा सयंत्राच्या जागेत आणखी ४ मेगावॅट वीज निर्मिती करणारा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे ठरविले आहे.

वरील निर्णयासोबत म.रा.वी.नि.कं.मर्या. व मेसर्स भेल यांनी दि. १२.०८.०९ रोजी एक संयुक्त उपक्रम भागीदारी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या करारानुसार लातूर येथे अत्यंत अत्याधुनिक २×६६० मेगावॅट आणि १५०० मेगावॅट क्षमतेचा वायु ऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. प्राथमिक कामे जसे जागा मिळविणे तसेच पाणी व इंधनाच्या साठ्यासाठी बोलणी सुरु आहेत.

नव्या प्रकल्पासाठी निधी सोय / व्यवस्था

सर्व नियोजित क्षमता वाढविणारे प्रकल्पासाठी लागणारा निधी कर्जे व भागभांडवल यांच्या ८०:२० गुणोत्तरात उभारले जातील. कंपनी आपल्या महसूलाचा काही भाग प्रकल्प विस्तारासाठी वापरेल. तसेच ८०% पर्यंतचा निधी वित्तिय संस्था आणि बँकांकडून उपलब्ध केला जाईल. उर्वरित २०% रक्कम मुख्यत्वे महाराष्ट्र राज्य सरकारकडून घेण्यात येईल.

पत गुणवत्ता

मे. क्रेडीट ॲनालिसीस ॲण्ड रिसर्च मर्यादित (CARE) या मान्यवर संस्थेने कंपनीची पत गुणवत्ता दीर्घकालीन कर्ज वा लघुकालीन कर्ज या दोन्ही करता तपासले आहेत त्यांच्या अहवालानुसार आपल्या कंपनीला दीर्घ कालीन कर्जासाठी “अ” उच्च श्रेणी प्रदान केली आहे म्हणजेच **कमीत कमी धोका असलेली** आणि लघुकालीन कर्जासाठी पी.आर.आय (PRI) म्हणजे **वेळच्या वेळी पैसे परत करू शकणारी व कमीत कमी धोका असलेली** कंपनी असे प्रमाणपत्र दिले आहे.

इंधन उपलब्धता

१. महानिर्मितीची कोळसा आवश्यकता

कोळशाची प्रतिवर्षी ४० दशलक्ष मेट्रीक टन एवढी गरज लागते. माहनिर्मितीला स्वदेशी, ई-लिलाव आणि आयात या विविध मार्गांनी एकूण ३७६९४ हजार मेट्रीक टन इतका कोळसा उपलब्ध झाला आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे:

स्वदेशी कोळसा : ३५१११ हजार मेट्रीक टन
(यातील ४९० हजार मेट्रीक टन ई लिलाव राखीव साठा आहे)

आयात कोळसा : २५८३ हजार मेट्रीक टन

२. इंधन पुरवठा करार

भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने नवीन कोळसा वितरण धोरण जाहिर केले आहे ज्यामुळे सर्व ग्राहकांना कोळसा

कंपनी बरोबर इंधन पुरवठा करार करावा लागणार आहे. त्याप्रमाणे मराविनिकं यांनी कोळसा उत्पादकांबरोबर वार्षिक करार केला आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे

कोळसा कंपनी	वार्षिक करार नग/ भाग एमएमटीपीए	स्वाक्षरी दिनांक	शेरा
डब्ल्यूसीएल	२२.७०१	२१.११.२००९	दि. १.४.०९ पासूनच्या कराराची वैधता २० वर्षे असून प्रत्येक ५ वर्षांनी कोळशाची वार्षिक गरज आणि इतर बाबींसाठी आढावा घेण्यात येईल.
एसइसीएल	६.०२७	२६.०६.२००९	
एमसीएल	६.१७२	२६.०६.२००९	
एससीसीएल	२.२६०	०५.०३.२००९	
एकूण	३७.१६०		

३. ई-लिलावातील कोळसा हिस्सा

दि. ५.०५.०९ रोजी महानिर्मितीने मे. एस्सीसीएल यांच्यासोबत वर दर्शविलेल्या वार्षिक कराराव्यतिरिक्त ४-५ लक्ष मेट्रीक टन अधिक कोळसा मिळविण्यासाठी ई-लिलाव हिस्से अंतर्गत करार केला आहे. वर्ष २००९-१० साठी परळी व चंद्रपूर विद्युत केंद्रांकरिता हा करार केला असून (पूर्व कराराव्यतिरिक्त) ₹ ९५०/- एवढी किंमत कोळसा खरेदीसाठी मोजावी लागेल.

४. कोळसा आयात

ऊर्जा मंत्रालयाने २००९-२०१० या वर्षात दिलेल्या २.२ दशलक्ष मे. टन लक्षाच्या बद्दल महानिर्मितीने २.० दशलक्ष में. टन कोळसा आयातीची मागणी दिली. मागील वर्षातील ४.६७ लक्षाची मागणी बाकी आहे. महानिर्मितीने तातडीच्या निकडीसाठी १.२ आणि २.६ लक्ष मे. टन कोळसा आयातीची मागणी केली आहे.

५. धुतलेला कोळसा करार

महानिर्मितीने डब्ल्यूसीएल, एमसीएल, एसईसीएल अशा वेगवेगळ्या कंपनीकडे धुतलेल्या कोळशाची मागणी नोंदवली आहे.

तपशील	डब्ल्यूसीएल विभाग	एसईसीएल विभाग	एमसीएल विभाग	
मागणी नग	१० दशलक्ष मे. टन /प्रतिवर्ष	२ दशलक्ष मे. टन / प्रतिवर्ष	३ दशलक्ष मे. टन / प्रतिवर्ष	२ दशलक्ष मे. टन / प्रतिवर्ष

६. वायु (आरएलएनजी / एन जी) - जीटीपीएस (महानिर्मिती)

- महानिर्मितीने मे. जी.ए.आय.एल. (भारत) मर्यादित यांच्यासोबत ३.५ एमएमएससीएमडी (एपीएमवायु) पुरवठा करण्यासंबंधी दीर्घकालीन करार केला आहे. परंतु मे. जीएआयएल एकूण ३.५ एमएमएससीएमडी पैकी फक्त २.५ एमएमएससीएमडी पुरवठा करीत आहे. मे. जीएआयएल द्वारा एपीएम दराने म्हणजेच १.९ (डॉलर) प्रति एमएमबीटीयूने पुरवठा होत आहे.

- मे. जीएआयएल सोबतचा करार मार्च २०११ पर्यंत वैध्य आहे. त्यानंतर तेल आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाने दिलेल्या भावानुसार पुढील कालावधीसाठी करार केला जाईल.

- अपुऱ्या इंधन साठ्यावर मात करण्यासाठी कंपनीने वायु खरेदी आणि पुरवठा करार मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. सोबत केला आहे. त्यानुसार मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. १.०० एमएमएससीएमडी /३२१४३ एमएमबीटीयू एवढा पुरवठा ५ वर्षांसाठी करेल. हा कालावधी २२ एप्रिल २००९ ते २१ एप्रिल २०१४ पर्यंत असेल. नैसर्गिक वायु हा (काकीनाडा - आंध्रप्रदेश) $४.२०५/एमएमबीटीयू या दराने मिळेल.

- जीटीपीएस उरण येथील सद्य भार राखण्यासाठी महानिर्मितीने अतिरिक्त ०.३ एमएमएससीएमडी आरएनएलजी / नैसर्गिक वायु मिळविण्याचे ठरविले आहे. "मागणी तसा पुरवठा" या तत्वावर ही खरेदी शासनांतर्गत असलेल्या कंपन्या जसे की, मे. ओएनजीसी / बीपीसीएल / आयओसीएल / जीएआयएल आणि मे. आरआयएल याच्याकडून मे. पेट्रोनेट एलएनजी मर्यादीत द्वारा ठरविलेल्या किंमतीवर करण्यात येईल.

मानव संसाधन संपत्तीचे व्यवस्थापन

आपले कर्मचारी ही कंपनीची सर्वात मोठी संपत्ती होय. त्यांच्या उत्तम कार्यक्षमतेसाठी सभोवतालचे वातावरण हे नेहमी उत्साहवर्धक आणि सृजनशील ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची असून त्या दृष्टिने आपली कंपनी सतत प्रयत्नशील असते. कर्मचारी वर्गाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी वेगवेगळी प्रशिक्षणे आयोजित केली जातात. शिक्षित, तंत्र-विशारद आणि बहुविध शिक्षित तज्ञ असे कर्मचारी हे महानिर्मितीकडे असलेले मोठे भांडवल आहे. त्यांच्या क्षमतेच्या सामर्थ्यावरच कंपनी नविन आव्हाने पेलू शकते. सांघिक श्रेष्ठता तत्वावर आपल्या कंपनीची पूर्ण श्रद्धा असल्यामुळेच "माणूस (कर्मचारी) हित प्रथम" हे तत्व पाळले जाते. ३१.०३.१० रोजी मंजूर कर्मचारी संख्या १६७७३ इतकी होती.

औद्योगिक संबंध

वर्षभरात कंपनीचे कर्मचाऱ्यांसोबत सलोख्याचे आणि शांततापूर्ण नातेसंबंध होते. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या क्षेत्रात आणि कल्याणासाठी भाग घेण्यास नेहमीच प्रोत्साहन देण्यात येते. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींसाठी अभ्यास वर्ग आयोजित केले जातात ज्यामुळे त्यांना सर्व स्थरावर बदलत्या व्यवसायाची रूपरेषा, संधी, धोके तसेच कंपनी सामना करत असलेली आव्हाने याबद्दल सूचीत केले जाते. एकंदरीत औद्योगिक नातेसंबंध हे शांततापूर्ण, सलोख्याचे आणि परस्पर विश्वासपूर्ण होते. व्यवस्थापन आणि कर्मचारी संघटना (युनियन) यांच्यामध्ये पगाराच्या फेररचनेचा करार झाला असून त्याची अंमल बजावणी एप्रिल ०८ पासून करण्यात आली आहे.

कोणत्याही कर्मचाऱ्याचे मासिक उत्पन्न ₹ २,००,०००/- प्रति महिना किंवा वार्षिक उत्पन्न ₹ २४,००,०००/- नाही ही माहिती कंपनी कायदा १९५६ कलम २१७ (२अ) व (कर्मचाऱ्यांविषयी) नियम १९७५ नुसार प्रस्तुत करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती, जमाति व इतर मागास वर्गासाठी राखीव जागा

आपली कंपनी महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी देण्यात येणाऱ्या राखीव जागेच्या अधिकृत सूचनेनुसार अनुसूचित जाती, जमाति व इतर मागास वर्गीय कर्मचाऱ्यांच्या नेमणूका आणि बढत्या करते.

प्रशिक्षण आणि विकास

कंपनीतील कर्मचाऱ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी अस्थापन नेहमीच कार्यरत आहे. महामंडळाच्या निगमी दूरदृष्टीनुसार

सर्वोत्तम, सुपरिणामी, सक्षम अशी देशातील वीज कंपनी ठरविण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. कंपनीची स्वत:ची दोन प्रशिक्षण केंद्रे आहेत. कोराडी आणि नाशिक येथे प्राथमिक स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाते. अधिकारी वर्गासाठी विविध स्वरुपाच्या कामाचे प्रशिक्षण प्रदान करण्यात येते. यात वीज निर्मिती करखान्याचे दैनंदिन कार्य व त्याचा विकास यांचा समावेश आहे.

याशिवाय गरजेनुसार कंपनी प्रशिक्षणाची व्यवस्था पुणे येथे 'यशदा' या केंद्रावर तसेच इएससीआय, हैद्राबाद; तंत्रविज्ञान महाविद्यालये, भेल, वर्ल्ड बँक, एन पी टी आय व इतर बाहेरील केंद्रांवर करते. ओ अ‍ॅन्ड एम (O & M), एमडीपी औद्योगिक सुरक्षा प्रकल्प, व्यवस्थापन आणि वागणूक कौशल्य इ. विषयांवर प्रशिक्षण शिबिर आयोजित केली जातात. या वर्षात एकूण ११२ प्रशिक्षण कार्यक्रम विविध कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आले.

मराठी भाषेचा वापर

आपली कंपनी दैनंदिन व्यवहार तसेच सरकारी खात्यांशी होणारा पत्र व्यवहार नेहमीच मराठी भाषेतून करते. वार्षिक अहवाल / लेखा परिक्षणे इ. तांत्रिक अहवाल मराठी भाषेतून सादर केल्या जातात.

पर्यावरण

पर्यावरणातील तत्वांचा तोल सांभाळण्याची कंपनी विशेषकरुन काळजी घेत असते व त्याकरिता योजलेल्या काही उपक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे:

- **वृक्ष लागवड व हरीत पट्टे यांचा विकास**

  महानिर्मितीने वनीकरणाची मोहिम आपल्या सर्व औष्णिक प्रकल्पांमध्ये राबविली आहे. लागवड केलेल्या सर्व झाडांची / वृक्षांची व्यवस्थित काळजी घेतली जाते. ३१.३.२०१० पर्यंत सुमारे २८.१ लाख झाडांची लागवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अटीनुसार सर्व औष्णिक केंद्रामध्ये हरित पट्टे विकसित करण्यात आलेले आहेत.

- **धुरांडी व धूर नियंत्रण**

  ठरविलेल्या उद्दिष्टाप्रमाणे महानिर्मितीने औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निघणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुढील प्रमाणे काही उपाय योजना केल्या आहेत.

  १७ जून्या संचामध्ये एसपीएम नियमांचे पालन होण्यासाठी ईएसपी सुदृढ करणे.

  उर्वरित ९ जुन्या संचाना एसपीएम पद्धत लागू करण्यासाठी महानिर्मितीने ठरवले आहे की निघणाऱ्या वायुवर अमोनियाची क्रिया करायची त्याप्रमाणे एएफजीसी पद्धतीनुसार कोराडी संच ७, चंद्रपूर संच १,२ येथे ही सुरुवात करण्यात आली असून त्याचे निरिक्षण सुरू आहे. कोरडी आणि चंद्रपूर येथील प्रयोग यशस्वी झाल्यावर इतर केंद्रांवर त्याची सुरुवात करण्यात येईल.

  महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आखून दिलेल्या नविन उत्सर्जन नियमांना अनुसरण्यासाठी इएसपी रेट्रोफिटींगचे काम करण्यासंबंधी मेसर्स भेल यांच्याबरोबर समजुतीच्या करार नाम्यावर सह्या करण्याची प्रस्ताव प्रक्रिया सुरु आहे.

- **वातावरणाची गुणात्मकता**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवलेल्या मर्यादेनुसार सर्व औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधली वातावरणाची गुणात्मकता असल्याची नेहमीच काटेकोरपणे तपासली केली जाते. ऑनलाईन एएक्यु नियंत्रण पद्धतीची स्थापना सुरू आहे.

- **वातावरण, आरोग्य व सुरक्षा तपासणी**

वातावरण, आरोग्य व सुरक्षा तपासणी ही २००४-०५ वर्षात केंद्रीय कामगार संस्था (भारत सरकार) यांनी केली आहे. सर्व औष्णिक वीज निर्मिती केंद्रामध्ये त्यांच्या शिफारसीची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

सर्व औष्णिक विद्युत केंद्रांची अंतर्गत तपासणी वर्ष २००९-१० या कालावधीत करण्यात आली आहे.

वातावरण, आरोग्य आणि सुरक्षा यांची तृतीय पक्षाकडून तपासणी वर्ष २०११-१२ या वर्षात सर्व औष्णिक केंद्रावर करण्यासाठी महानिर्मितीची बोलणी सुरु आहे.

- **राखेचा वापर**

मागील ६ वर्षात महानिर्मितीने राखेचा वापर परिणामकारक केलेला आहे, त्याची आकडेवारी पुढीलप्रमाणे:

वर्ष	राख वापर टक्केवारी
२००४-०५	१५.९५
२००५-०६	२४.१०
२००६-०७	२७.००
२००७-०८	३०.६०
२००८-०९	४३.२३
२००९-१०	४९.७२

१) नाशिकच्या औष्णिक वीज केंद्रात दि. १८.०५.२०१० आणि १९.०५.२०१० या दिवशी राखेचा वापर विटा बनविण्यासाठी कसा करता येईल यावर एक चर्चासत्र आयोजित केले होते.

२) बारामती येथे शेतकऱ्यांसाठी उडून जाणाऱ्या राखेचा वापर शेती आणि विटांच्या निर्मितीसाठी कसा करावा याचे प्रदर्शन महानिर्मितीने दि. १.११.२०१० ते ४.११.२०१० या दरम्यान केले.

- **औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून निघणाऱ्या राखेची उपयुक्तता वाढविण्यासाठी संशोधन प्रकल्प.**

खाण भरणे

दुर्गापूर येथील खाणीत अंदाजे १ लाख घन मी. इतकी राख टीआयएफएसी आणि डब्लूसीएल यांच्या मदतीने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात प्रायोगिक.तत्वावर करण्यात आली आहे. राखेचा उपयोग खाण बुजवणे, पाटबंधारे आणि रस्त्याच्या कामासाठी करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ/योग्य अधिकाऱ्यांकडे पाठविला आहे.

निसृत पाणी वापर यंत्रणा

महानिर्मितीने आपल्या विविध औष्णिक वीज निर्मिती केंद्रात वाहून जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करण्याची सोय करणारी यंत्रणा बसवली आहे. अशाप्रकारे पुनर्वापर केलेल्या पाण्याची टक्केवारी पुढे दिल्याप्रमाणे:

१.	भुसावळ	३४.६४%
२.	चंद्रपुर	१७५.५६%
३.	कोराडी	६४.७६%
४.	खापरखेडा	९१.५१%
५.	नाशिक	८२.०६%
६.	परळी	९०.६०%
७.	पारस	१८.४८%

धोकादायक टाकाऊ मालाची विल्हेवाट

यासाठी महानिर्मितीने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकृत कार्यालयांशी संगनमत केले आहे.

नवीन प्रकल्पांसाठी एमओईएफ कडून पर्यावरण मान्यतेबाबत सद्यस्थिती

अ) कोराडी औष्णिक वीज केंद्र ३×६६० मेगावॅट येथे वातावरण शुद्धीसाठीचा परवाना दि. ०४.०१.२०१० रोजी मिळाला.

ब) एमओईएफ कडून प्रकल्पासाठी टीओआर लागू करण्यात आले.

१×६६० मेगावॅट भुसावळ पर्यायी प्रकल्प

४×८०० मेगावॅट धोपावे (सुधारित - ३×६६० मेगावॅट)

क) पुढील प्रकल्पांसाठी वातावरण शुद्धीचा परवाना मिळवण्याची प्रक्रिया सुरु आहे.

१×२५० मेगावॅट पारस पर्यायी प्रकल्प

२×६६० मेगावॅट दोंडाईचा वाढीव ऊर्जा प्रकल्प

१×६६० मेगावॅट नाशिक पर्यायी वीज प्रकल्प

भिवकुंड कोळसा ब्लॉक

२×६६० मेगावॅट कानपा वाढीव ऊर्जा प्रकल्प

२×६६० मेगावॅट मेंडकी वाढीव ऊर्जा प्रकल्प

२×६६० मेगावॅट लातूर वाढीव ऊर्जा प्रकल्प

२×६६० मेगावॅट गोंदीया वाढीव ऊर्जा प्रकल्प

ड) सीडीएम प्रकल्प

नवीन प्रकल्पांमध्ये उच्च तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. त्यामुळे कोळशाचा वापर कमी होईल पर्यायाने वायु प्रदुषण नियंत्रणात राहील म्हणून आम्ही ह्या उच्च तंत्रज्ञान प्रकल्पाची कास धरली आहे.

संचालक

यावर्षी दि. ३१.०८.०९ पासून श्री. व्ही.टी. बापट यांच्या ऐवजी श्री. सी. एस. थोटवे यांची संचालक (प्रकल्प) पदी नियुक्ती झाली.

श्री. पी. अब्राहम यांनी १७.०५.१० ला अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यामुळे श्री. सुब्रतो रथो, व्यवस्थापकिय संचालक यांची अध्यक्ष आणि व्यवस्थापकिय संचालक पदी नेमणूक करण्यात आली.

श्री. पी. अब्राहम यांच्या कंपनी सोबतच्या कामासाठी संचालक मंडळ नेहमीच ऋणी राहिल. नवीन नियुक्त झालेल्या सर्वांचे संचालक मंडळातर्फे स्वागत आहे.

लेखा परिक्षण समिती

महानिर्मितीची नवीन लेखा परिक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे. श्री. पी.व्ही.पागे, अध्यक्ष, श्री.जी.जे.गिरासे, संचालक (वित्त) आणि श्री. एम्.आर.शेलार संचालक (सं) समितीचे सदस्य आहेत. यावर्षी या समितीच्या एकुण पाच बैठका झाल्या आहेत.

संचालकांच्या जबाबदारी संबंधी निवेदन

कंपनी कायदा १९५६ चे कलम २१७(२एए) अनुसार संचालकांच्या जबाबदाराचे निवेदन पुढीलप्रमाणे आहे.

१) लागू असलेल्या लेखामानांकनांप्रमाणे वार्षिक हिशेब ताळेबंद तयार केलेले असून लेखामानांकनांप्रमाणे बाबी नसल्यास त्याचा योग्य खुलासा केला असल्याची खातरजमा करतो.

२) निश्चित केलेली हिशोब लिखाण धोरणे ही योग्य प्रकारे आणि सतत लागू केलेली आहेत व निवाडा निर्णय आणि अंदाजपत्रके ही सुयोग्य असून ती विवेकपूर्ण पद्धतीने बनविली गेली आहेत. जेणेकरून दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यंत कंपनीच्या स्थितीचा योग्य आढावा घेता येईल, आणि कंपनीच्या नफ्याचे परिक्षण करता येईल.

३) कंपनी कायदा १९५६ नुसार संचालकांनी योग्य, पुरेसा वेळ व काळजी घेऊन लेखा पद्धतीचे विवरण देणारी कागदपत्रे, दप्तरे ही तयार केली आहेत, जेणेकरुन कंपनीची संपत्ती, मालमत्ता यांची सुरक्षा अबाधित राहील आणि कुठलीही अफरातफर झाल्यास उघडकीस येईल.

४) चालु नित्य व्यवसाय या आधारेच आर्थिक वर्ष जे ३१ मार्च २०१० रोजी संपते, त्याचे वार्षिक लेखा हिशेब तयार करण्यात आले आहेत.

ऊर्जा संवर्धन व नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे व परकीय चलन व्यवहार:

कंपनी कायदा १९५६ च्या कलम २१७ (१)(इ) यातील तरतुदीनुसार ऊर्जा संवर्धन, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे व

परकिय चलन मिळकत व खर्च याबद्दलची माहिती संचालक मंडळाच्या नियम १९८८ नुसार परिशिष्ठ (अ) दिलेली आहे.

सांविधानीक लेखा परिक्षकांच्या निरिक्षण / स्पष्टिकरणाला उत्तर

परिशिष्ट - ब मध्ये सांविधानीक लेखा परिक्षकांच्या निरिक्षण / स्पष्टिकरणाला उत्तर दिले आहे.

नियत ठेवी

या वर्षी कंपनीने लोकांकडून कोणत्याही प्रकारच्या नियत ठेवी मागितल्या / मिळविल्या नाहीत.

विमा

कंपनीची सर्व मालमत्ता/संपत्ती इत्यादींचा योग्य विमा केलेला आहे.

परिव्यय लेखा परिक्षक

३१/३/२०१० ला संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीने मेसर्स एन्. आय. मेहता आणि कंपनी आणि मेसर्स एस्. आर. भार्गवे आणि कंपनी, यांची परिव्यय लेखा परिक्षक म्हणून नेमणूक केली आहे. ही नेमणूक भारत सरकारच्या सांघिक कारभार मंत्रालयाकडून मंजूर होणे अपेक्षित आहे.

लेखा परिक्षक

कंपनीचे संविधिक लेखा परिक्षक हे महालेखाकार वाणिज्यिक, लेखापरिक्षा यांचेकडून नेमले जातात. मेसर्स जी. एम कापाडिया ॲण्ड कंपनी, मुंबई; मेसर्स सी.व्ही.के. ॲन्ड असोसिएट्स, मुंबई आणि मे. के. एस. अय्यर ॲन्ड कंपनी, मुंबई यांची संयुक्तपणे संविधिक लेखा परिक्षक म्हणून आर्थिक वर्ष २००९-१० या काळावधी साठी नेमणूक झाली आहे.

आभार

कंपनीचे संचालक हे केंद्र सरकारचे अधिकारी, कर्मचारी, आर्थिक संस्था, बँका, संविधिक लेखा परिक्षक, परिव्यय परिक्षक, महानियंत्रक व महालेखापरिक्षक, नवी दिल्ली, महालेखापरिक्षक (वाणिज्य) मुंबई, केंद्रीय व राज्य स्तरीय वीज नियामक अधिकारी, कंपनीचे भागधारक या सर्वांचे ऋणी आहोत म्हणून त्या सगळ्यांचे आभार मानतो आहोत, संचालक मंडळ कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे देखील आभारी आहे.

संचालक मंडळाच्या वतीने

सुब्रत रथो
अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक

स्थळ: मुंबई
दिनांक: १५ जानेवारी २०११

संचालकांच्या अहवालाचे पूरकपत्र अ

कंपनीच्या अंतर्गत येणारे तपशील (मंडळाचे संचालकांच्या अहवालाचे तपशील) नियम १९८८ नुसार:

अ) ऊर्जा संवर्धन

२००९-२०१० या कालावधीत ऊर्जा वाचविण्यासाठी पुढील कार्यक्रम / योजना राबविण्यात आल्या:

- संपिडीत वायु, पाणीपुरवठा, थंड पाणी व्यवस्थापन आणि हिटर यांची ऊर्जावापर तपासणी करण्यात आली.
- वीजनिर्मिती केंद्रातील कर्मचाऱ्यांमध्ये ऊर्जा बचतीची जाणीव निर्माण करण्यासाठी विविध प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले.
- ऊर्जा बचतीची जाणीव वाढविण्यासाठी भीत्तीपत्रक आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
- महानिर्मितीकडे अभियंतांचा एक ताफा आहे जे ऊर्जा संवर्धनाचे काम करतात व ऊर्जावापर तपासणी करतात त्यांच्या ज्ञानाचा फायदा महानिर्मितीला आपल्या दैनंदिन कार्यप्रणालीत होतो.

सहाय्यकारी ऊर्जा वापर

- ०.२ वर्ग ऊर्जामीटरच्या वापराने सहाय्यक ऊर्जा वापराची तंतोतंत आकडेवारी मिळते.
- सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त वापर.
- उपयोगात नसलेले दिवे, पंखे व इतर उपकरणे बंद करणे.
- प्रकाशयोजनेत कमी वीज वापरून अधिक प्रकाश देणारी उपकरणे वापरणे.
- संपीडीत वायुयंत्रणा, वाफ वाहक नळ, सयंत्र थंड करणाऱ्या जलवाहिन्या व वीजवाहकातील गळती थांबवणे.
- डी. एम. पाणी प्रवाहमापक बसवले आहेत.
- उरण येथील वायु संचामध्ये नैसर्गिक थंडावा देणाऱ्या पद्धती बसवल्या आहेत.
- यंत्रांची वेळोवेळी पाहणी करून वेळीच त्यांची दुरुस्ती करून अपव्यय टाळणे.

प्रकाश योजना

- जुने एचपीएमव्ही दिवे बदलून नवे एचपीएसव्ही दिवे बसवले आहेत.
- विद्युती स्थैर्यभार आणि सी.एफ.एल. दिव्यांचा वापर.
- शक्यतोवर सर्व दिव्यांना प्रत्येकी उघड/बंदची बटणे बसविले.

उष्णता ऊर्जा

- संधारित नळ सफाई यंत्रणेवर लक्ष ठेवणे.
- गरज पडताच औष्णिक विसंवहनला दुरुस्त करणे.
- हवा तापवणारी यंत्रंणा आणि भट्टया स्वच्छ ठेवणे.
- बाष्पपात्रात येणारी अतिरिक्त हवा प्रमाणित करणे.
- उष्णतादर प्रत्येक आठवड्याला / पंधरवड्याला व दरमहा अधिक्षक अभियंता / महाव्यवस्थापक / मुख्य महाव्यवस्थापक यांच्या देखरेखीखाली प्रमाणित केला जातो.

वंगण

- सर्व ऊर्जा केंद्रात शून्य ऊर्जा गळती हा विचार राबवला जातो.
- वाहत्या पाण्याबरोबर वाहून जाणारे तेल - तेलांश काढून घेणारी चाळणी तयार केली आहे.
- भुसावळ व नाशिक औष्णिक वीज निर्मिती केंद्रात वीजचक्की व बी.एफ.पी. तेल गाळणारी अपकेन्द्री यंत्रणा बसवली आहे.

डीएम वॉटर

- डीएम वॉटर व बाष्प गळती त्वरीत थांबविली जाते.
- खापरखेडा औष्णिक वीज निर्मिती केंद्रात उखळणी नळ तपासणी यंत्रणा बसवली आहे.

इतर पाणी

- राखाडी थंड करण्यासाठी वापरलेले पाणी शुद्ध करण्याची यंत्रणा कोराडी, नाशिक, खापरखेडा व चंद्रपूर औष्णिक वीज निर्मिती केंद्रात बसविली आहे.
- अग्निशमनासाठी जमिनीत बसवलेले नळ जमिनीवर आणले आहेत जेणेकरुन गळती थांबवता येईल.

ब) तंत्रज्ञान आत्मसात करणे

अ) पुढील नमुना ब नुसार तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे प्रयत्न केले जात आहेत

नमुना ब

तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी तपशील उघड करणारा नमुना

- अमोनिया वायु अंत:क्षेपण प्ल्यू पद्धती स्थापणे.
- परळी औष्णिक विद्युत केंद्र संच - ३ येथील वापर पद्धतीचे सुधारीकरण
- महानिर्मितीचे मुख्यालय आणि उत्पादक केंद्र येथील सामान / साहित्य खरेदीसाठी “ई” निविदांची अंमलबजावणी

संशोधन व विकास

१) कंपनीच्या खाली उल्लेखिलेल्या काही खास व्यवस्थांमध्ये संशोधन आणि विकासाचे काम करण्यात आले.

शीतल पाण्याचे ओझोनीकरण: एएफजीसी व्यवस्था, उरण येथे आयलँड आणि ब्लॅक स्टार्ट सुविधा, एअर हिटर्स मध्ये निराफॉन ॲकॉस्टिक क्लिनिंग सिस्टिम, ट्यूब गळती शोधण्यासाठी ट्यूब गळती शोधन व्यवस्था, कोळसा खाणीसाठी एमपीएसपी व्यवस्थेची योजना, तेलाचा पुर्नवापर आणि वाया गेलेले तेल पुन्हा मिळविण्यासाठी तेल गाळणी आणि तेल स्किमवर यंत्रांची योजना.

२) वर उल्लेखिलेल्या संशोधन आणि विकास कामाचे फलित:

ओझोनीकरण: पारंपारिक पद्धतीपेक्षा कमी खर्चात कार्यान्वित होणारी पद्धती, धातूच्या गंजण्याच्या प्रक्रियेत झालेली घट, हाताळणीसाठी सुरक्षित पद्धती, पाणी शीतल पद्धतीत लिगिओनेला जीवाणूंची पातळी नष्ट करण्यासाठी ही पद्धती प्रभावी ठरते.

अमोनिया अंत:क्षेपण फ्यू गॅस (वायू) पद्धत: प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अटिनुसार सर्व औष्णिक विद्युत केंद्रामधील एसपीएम पातळी १५० एमजी / एनएम३ खाली राखली जाते.

आयलँड व्यवस्था: चालू व्यवस्थेत काही बिघाड / बंद झाल्यास आयलँड व्यवस्था आणि जीटीपीएस कार्यान्वित होऊन ग्रीडला बाजूला केले जाते.

ब्लॅक स्टार्ट सुविधा: एखाद्या वेळेस ग्रीडला झटका लागला आणि त्याच वेळेस आयलँड व्यवस्था देखील बंद पडली तर ग्रीड सुविधेमुळे केंद्र लवकरात लवकर पुन्हा कार्यान्वित करण्यात मदत होते.

३) भविष्यातील योजना

आणखी काही औष्णिक केंद्रावर ए.एफ.जी.सी. पद्धत लागू करणे.

ऑनलाईन ऊर्जा व्यवस्थापनाचा अवलंब करणे.

४) संशोधनावरील खर्च

निरंक

तंत्रज्ञान आत्मसात करणे, अंगीकरणे आणि फेरफार करणे

१. तंत्रज्ञान आत्मसात करणे, स्वीकारणे आणि त्यात फेरफार / नुतनीकरण करणे यासाठी खास प्रयत्न केले जातात.

२. वरील प्रयत्नातून येणारा निकालाचा फायदा

कंपनीने कोणत्याही विदेशी तंत्रज्ञानाचा वापर केला नाही.

क) परकिय चलन मिळकत आणि खर्च

- निर्यातीसाठी लागणारी हालचाल, निर्यात वाढविण्यासाठी लागणारा पुढाकार, उत्पन्न आणि सेवेसाठी नवीन निर्यात बाजारपेठ, विकास आणि निर्यात योजना.

- एकूण परकिय चलन मिळकत आणि खर्च वापर

एकूण परकिय चलन वापर / मिळकत	₹
१. परकिय चलन खर्च	
अ) भांडवली मालमत्तेची किंमत सीआयएफ तत्वावर व सुटेभाग किंमत सीआयएफ तत्वावर	२,१६०,८०२,२११ १३,०३२,५३४
ब) खर्च	
वाहतूक खर्च	निरंक
२. परकिय चलन मिळकत	निरंक

पूरकपत्र "ब १"
लेखा परिक्षकांच्या अहवालातील बाबींचा खुलासा
०१.०४.२००९ ते ३१.०३.२०१०

अनु.	लेखापरिक्षकांचा परिच्छेद	महानिर्मिती कंपनीचा खुलासा
१)	सोबतचा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा ताळेबंद हिशेब तक्ता ३१ मार्च, २०१० पर्यंतच्या कालावधीचा आहे व नफा तोट्याचा हिशेब तक्ता, जो त्याच तारखेला संपणाऱ्या वर्ष अखेरीचा आहे. तसेच रोकड प्रवाह तक्ताही वर उल्लेखिलेल्या वर्ष अखेरीसाठी आहे. ही सर्व कागदपत्र व लेखा आम्ही तपासले आहे. आर्थिक व्यवहारासंबंधी ही हिशेब मांडणीची जबाबदारी पूर्णत: कंपनी व्यवस्थापनाची असून, आमची जबाबदारी आमच्या अंकेक्षणाच्या आधारे त्यावर मत प्रदर्शन करण्यापुरती आहे.	वस्तुस्थिती
२)	भारतात सर्वसाधारणत: मान्यताप्राप्त अशा अंकेक्षण नियमानुसार हे लेखापरिक्षण केलेले आहे. त्या मान्यताप्राप्त दर्जानुसार आम्ही आमचे लेखापरिक्षण हे पुरेशी, खात्रीलायक आर्थिक व्यवहारसंबंधी माहिती, तपशील मिळवून, तो तपशील कुठल्याही प्रकारचा संशयास्पद व्यवहार दाखवित नाही हे तपासतो. हे सर्व प्रकारचे आर्थिक तक्ते तयार करणे ही सर्वोतोपरी आस्थापन (कंपनी) व्यवस्थापनाची जबाबदारी असते. लेखा परिक्षणांतर्गत नमुन्यादाखल तक्त्यात दाखवलेले काही खर्च इत्यादींची सत्यता पडताळून पाहणे, त्याचप्रमाणे लेखा परिक्षणांतर्गत लेखा तक्ते उभारणीत वापरलेली पद्धत ही मान्यताप्राप्त अशीच असल्याची खात्री करून घ्यायची असते. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाने एकंदरीतपणे आपले लेखा तक्ते सुयोग्य पद्धतीत सादर केले आहेत ना हे पण तपासायचे असते. आमचा असा विश्वास आहे की, आमचे लेखापरिक्षण आम्ही दिलेल्या मतांसाठी पुरेसे व सुयोग्यपणे आधारभूत आहे.	वस्तुस्थिती
३)	कंपनी कायदा (लेखा परिक्षण अहवाल) २००३ यातील हुकुमान्वये, तसेच (कंपनी कायदा लेखा परिक्षण अहवाल), (सुधारित हुकुम २००४) जे भारताच्या केंद्र सरकारने प्रकाशित केले त्याच्या उपखंड ४(अ) मूळ कलम २२७ कंपनी कायदा १९५६, च्या हुकुमातील परिच्छेद ४ व ५ यात सांगितलेले संबंधित विषयाचे तक्ते सोबत जोडत आहोत.	वस्तुस्थिती
४)	वर उल्लेखिलेल्या पुरवणीमधील आमची टिप्पणी व्यतिरिक्त आम्ही असे नमुद करीत आहोत की: १. आमच्या माहिती आणि विश्वासाप्रमाणे आमच्या लेखा परिक्षण प्रक्रियेच्या पूर्ततेसाठी लागणारे सर्व प्रकारचे खुलासे आणि माहिती आम्ही कंपनी व्यवस्थापनाकडून मिळवलेली आहेत.	वस्तुस्थिती

	२.	आमच्या पाहणी परिक्षेत आढळून आल्याप्रमाणे आम्ही असे नमूद करतो की कंपनी कायद्यानुसार हिशेबाच्या सुयोग्य पद्धतीची पुस्तके/दप्तर इत्यादी या कंपनी व्यवस्थापनाने तयार करून ठेवली आहेत.	वस्तुस्थिती
	३.	ताळेबंद पत्रक, नफा-तोटा यांचे पत्रक तसेच रोकड प्रवाह पत्रक जी या लेखा परिक्षणासाठी आमचे समोर आली ती या लेखा पुस्तकाशी मिळती जुळती आहेत असे दिसून आले आहे.	वस्तुस्थिती
	४.	सरकारी अधिसूचना क्रं. जी.एस.आर. ८२९(ई) दिनांक २१/१०/२००३ मधील सूचनेनुसार सरकारी आस्थापने यांना कंपनी कायदा १९५६ च्या कलम २७४(१)(जी) यातील कलमातून सूट देण्यात आली आाहे.	वस्तुस्थिती
	५.	अनुसूची १५ मधील टीप क्रमांक २१ (इ) कडे लक्ष वेधण्यात येत आहे. कंपनी (लेखा मानांकन) अधिनियम २००६ मधील लेखा मानाकंन १९ "लीजेस" नुसार द्यावयाच्या माहितीची पूर्तता करण्यात आलेली नाही. विविध जलविद्युत केंद्रांबाबत म.रा.वी.नि.कं.मर्या. ने महाराष्ट्र शासना सोबत करावयाच्या भाडे करारांअभावी ही माहिती देण्यात आलेली नाही.	महाराष्ट्र शासनाच्या जलविद्युत निर्मिती केंद्राचे भाड्याचे दर हे महानिर्मिती एमइआरसी नुसार दिले आहेत.
	६.	खाली नमुद केलेले मुद्दे वगळता, आमच्या मते या अहवालातील ताळेबंद पत्रक, नफा-तोटा हिशेब आणि रोकड प्रवाह पत्रक ही १९५६ च्या आस्थापन कायदा खंड २११ च्या उपखंड (३सी) च्या लेखा दर्जाच्या संदर्भात स्विकार संमत आहेत.	
		अ) कंपनीच्या विशिष्ट जागी असलेल्या मालसामान यादीत यंत्रणेचे काही सुटे भाग समाविष्ट आहेत. परंतू हिशेब धोरण क्र. १ (एफ) अनुसूची क्र. १५ तसेच लेखामानांक १० (मालमत्तेचे हिशेब) व लेखामानांक २ (इन्स्टीट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया) नुसार या यंत्रणेच्या सुट्या भागांचे भांडवलीकरण करून उपयोगी वर्षापर्यंत त्यावर घसारा आकारण्यात यावा. याची पूर्तता न केल्यामुळे आर्थिक विधानावर जर काही परिणाम होत असेल तर तो अत्यावश्यक सुट्या भागांच्या अपूर्ण यादीमुळे निश्चित ठरवता येत नाही..	कंपनीने अशा सुट्टया भागांच्या खरेदीचे कागदपत्र शोधण्याचे काम सुरु केले आहे जेणकरुन त्याच्या किंमतीचे भांडवलीकरण करुन व त्यानुसार त्यांची घसारा किंमत ठरवून २०१०-११ च्या ताळेबंदात समाविष्ट करण्यात येईल.
		ब) कंपनी (लेखामानांकन) अधिनियम २००६ आणि हिशेब धोरण क्रमांक १ (इ) अनुसूची १५ नुसार ताळेबंदात कंपनीने आर्थिक वर्ष अखेरीस "सदोष संपत्ति" तोट्याचे लेखामानांकन २८ नुसार मुल्य मापन केलेले नाही. यामुळे आर्थिक विधानांवर जर काही परिणाम होत असतील तर ते निश्चित केलेले नाहीत.	कंपनी २०१०-११ या वर्षात हे काम करेल.

